पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक २७/०७/२०१९

## २८ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान गडचिरोली पोलीस साजरा करणार 'आदिवासी विकास सप्ताह'

दरवर्षी दिनांक २८ जुलै ते ३ ऑगस्ट या दरम्यान नक्षलवादी बंद पुकारुन आदिवासी जनजीवन विस्कळीत करण्याच्या प्रयत्न करत असतात. यावर्षी देखील नक्षलवाद्यांनी बंद पुकारला आहे. हाच धागा पकडुन गडचिरोली जिल्हा पोलीस अधिक्षक, श्री शैलेश बलकवडे साो. यांच्या संकल्पनेतुन गडचिरोली जिल्हा पोलीस दलाचा वतीने दिनांक २८ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान जिल्हाभरात 'आदिवासी विकास सप्ताह' चे आयोजन करण्यात येणार आहे.

या निमित्ताने आदिवासी जनतेच्या विकासाच्या दृष्टीने शासन राबवित असलेल्या योजना आदिवासी बांधवांचा घरापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासाठी 'आदिवासी विकास जनमैत्री मेळव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. यात विविध प्रशासकीय विभागांना पाचारण करण्यात येवुन संबंधित विभागांचे विकाससंबंधी आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करण्यात येईल. पोलीस विभागातर्फे आठवडाभरात मनोरंजनाचे कार्यक्रम अंधश्रध्दा निमूलनाचे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेती मशागतीच्या पध्दतीचे ज्ञान देण्यात येईल. पीक कृषी विमा योजनेसबंधी माहीती देण्यात येईल. महिलांच्या समस्यांविषयी त्यांच्यात जागृती निर्माण व्हावी यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. 'आदिवासी विकास रॅलीचे' आयोजन करण्यात येवुन त्याद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवुन दिले जाणार आहे. तसेच युवकांसाठी मार्गदर्शन शिबीरे आयोजित करण्यात येवुन शिक्षणासंबंधी त्यांच्यातील शिक्षणाबद्दलची गोडी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्याचबरोबर पोस्टे/उप पोस्टे/पोमके मार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र काढुन देण्यासाठी मदत करण्यात येईल.